**<u>नियमित दिवाणी दावा क्र. ३९/२०२१</u>**

## <u>निशाणी ४९ खालील आदेश</u>

प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज हा प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्याविरुध्द नि.१ वर दि.०१.०८.२०२४ रोजी विनाकैफियत झालेला आदेश रद्द होवून त्यांची कैफियत व म्हणणे स्वीकारण्याची विनंती केली आहे.

**०२.** प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे त्यांचे नोकरी व्यवसायामुळे तसेच प्रतिवादी क्र. ३ हे वयोवृध्द असल्याने त्यांना कायद्याचे ज्ञान नसल्यामुळे त्यांना वकिलांना भेटून आवश्यक ती माहिती व कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यांच्याविरुध्द विनाकैफियत झालेला आदेश रद्द न झाल्यास त्यांच्यावर पैशाचे स्वरुपात न भरुन येणारे नुकसान होईल. सबब, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदर आदेश रद्द करण्याची व त्यांची कैफियत व म्हणणे स्वीकारण्याची विनंती केली.

**०३.** प्रस्तुत अर्जावर वादींनी निशाणी ५१ नुसार म्हणणे दिले की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी केलेला अर्ज हा खोटा व खोडसाळ असून त्यातील दिलेली कारणे ही समर्पक व योग्य नाहीत. तसेच प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सदरचा अर्ज विलंब होण्याच्या हेतूने दिलेला आहे त्यामुळे सदर अर्ज फेटाळण्याची विनंती केली आहे. प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास तो जास्तीत जास्त कॉस्टसह मंजूर करण्याची विनंती केली.

**०४.** अर्जातील कथन व त्यावर दिलेले म्हणणे यांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. दाव्याच्या अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.२१.०३.२०२४ रोजी प्रतिवादी क्र. २ हे दाव्यामध्ये हजर झाले, तर दि.०८.०५.२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ हे दाव्यामध्ये हजर झाले. दि. ०८.०५.२०२४ रोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी विधीज्ञ श्री. चिकणे यांचे वकीलपत्र सादर केले परंतु कैफियत व म्हणणे दाखल करण्यासाठी मुदत मागितली. त्यानंतर दि.०२.०७.२०२४ रोजी प्रतिवादी यांनी कैफियत सादर करण्यासाठी पुन्हा मुदत मागितली. न्यायालयाने प्रतिवादींना त्यावेळी त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करण्याकरीता शेवटची संधी म्हणून मुदत दिली. तरीही त्यांनी कैफियत सादर केली नाही त्यामुळे न्यायालयाने दि.०१.०८.२०२४ रोजी त्याच्याविरुध्द विनाकैफियतचा आदेश पारीत केला. आजरोजी प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुत विचाराधीन अर्जासोबत

कैफियत व म्हणणे सादर केले आहे परंतु ते अकरा महिन्याच्या विलंबानंतर केले आहे. प्रस्तुतचा दावा हा वाटप व हक्क ठरावाकरीता सादर केला आहे. याबाबत काही दुमत नाही की, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादींना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिली पाहिजे. प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर स्वीकारण्यात आली नाही तर वादींच्या तुलनेत त्यांचे अधिक नुकसान होऊ शकते. प्रतिवादींनी केलेल्या दिरंगाईबाबत वादी यांना प्रतिवादींकडून योग्य ती कॉस्ट देवून नुकसान भरपाई करता येईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज हा मंजूर करण्यालायक आहे. सबब, खालील आदेश पारित करतो.

## आदेश

०१. अर्ज **नि.४९** मंजूर करण्यात येतो.

०२. प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुद्ध विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रत्येकी वादी यांना रु.५००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर रद्द ठरविण्यात येत आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वरील अटीची पुर्तता केल्यास विनाकैफियत आदेश रद्द समजला जाईल अन्यथा सदर आदेश 'जैसे थे' राहिल.

०४. वरील अटीची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी या अर्जासोबत सादर केलेले म्हणणे व कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

CHAVAN SANJAY MOTIRAM

Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2025.05.07 17:38:52 +0530

**(एस.एम. चव्हाण)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,**
**ता. खेड, जि. रत्नागिरी**

**दिनांकः ०६.०५.२०२५**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No.39/2021 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Shri. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC Court, Khed. |
| Date of Decision | : | 06.05.2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 06.05.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 07.05.2025 |